दैनिक
दिव्यमराठी

दि. २६ ऑगस्ट, २०२४

**कडक संदेश** • जळगावच्या मेळाव्यात पंतप्रधान मोदींचे निर्देश

# महिलांवरील अत्याचार अक्षम्य पाप, कुणीही दोषी सुटता कामा नये : मोदी

प्रतिनिधी | जळगाव

देशातील कोणतेही राज्य असो तेथील बहिणी, मुलींना होणारा त्रास, संताप मला समजत आहे. महिलांविरुद्धचे गुन्हे हे अक्षम्य पाप आहे. या प्रकरणांतील दोषी कोणीही असो, तो सुटता कामा नये. त्यांना कोणत्याही रूपात मदत करणारेही सुटायला नको. हॉस्पिटल, शाळा, कार्यालये किंवा पोलिस व्यवस्थेचा ज्या स्तरावर निष्काळजीपणा होतो त्या सर्वांचा हिशेब झाला पाहिजे. हा स्पष्ट संदेश वरपासून खालपर्यंत गेला पाहिजे, असे निर्देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्य सरकारांना दिले आहेत. या वेळी नेपाळ बस दुर्घटनेत जळगाव जिल्ह्यातील मृत झालेल्या नागरिकांप्रति त्यांनी शोक संवेदना व्यक्त केली.

जळगाव विमानतळासमोरील प्राइम इंडस्ट्रियल पार्कवर झालेल्या लखपती दीदी मेळाव्यात ३७ मिनिटे २२ सेकंदांचे पंतप्रधानांचे संपूर्ण भाषण हे महिलाशक्तीवर केंद्रित होते. देशातील लाखो स्वयंसहाय्यता समूहांसाठी मोदींच्या हस्ते रिमोट दाबून साडेसात उर्वरित. पान २



पळसखेडा (ता. जामनेर) येथील गायत्री बचत गटाच्या वंदना पाटील यांना लखपती दिदीचे प्रशस्तीपत्र देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदी.

## नेपाळ बस दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना ५ लाखांची मदत : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या भाषणात, नेपाळ बस दुर्घटनेत मृत्यू झालेल्या प्रवाशांप्रती शोक सहवेदना व्यक्त केली. या अपघातातील मृतांच्या कुटुंबीयांना ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली. जळगावच्या मेळाव्याने गर्दीचे सर्व विक्रम मोडले असल्याचेही त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पासाठी केंद्र सरकारने मदत करावी अशी मागणी केली तसेच राज्यात स्वयंसाहाय्यता समूहांच्या २५- ५० लाख लखपती दिदी झालेल्या असतील असे सांगितले. ६.५० लाख स्वयंसाहाय्यता समूहांमध्ये ६४ लाख महिला आहेत. त्यांना २५ हजार कोटींवर कर्ज व समुदाय संसाधन निधी देण्यात आल्याचे सांगितले.

## घरबसल्या ई-एफआयआरची सुविधा

अत्याचारप्रकरणी वेळेवर एफआयआर दाखल होत नाही, सुनावणी होत नाही, खटल्याला विलंब लागत असल्याच्या अगोदर तक्रारी येत होत्या. अशा अनेक अडचणींना आम्ही भारतीय न्याय संहितेद्वारे दूर केले. त्यात झालेल्या तरतुदींबाबतही मोदी यांनी माहिती दिली. पीडितेला पोलिस ठाण्यात जाणे शक्य नसल्यास घरबसल्या ई-एफआयआर नोंद करता येणार आहे. यात पोलिस ठाण्यांना छेडछाड किंवा फेरफार करता येणार नाही असा कडक कायदा केला आहे, जेणेकरून तपास वेगाने आणि दोषींना कठोर शिक्षा होण्यास मदत होईल. अत्याचार रोखण्यासाठी केंद्र सरकार सर्वतोपरी राज्य. सरकारांसोबत असल्याबाबतही त्यांनी आश्वस्त केले.

## भाषणात सहा वाक्ये मराठीत बोलले...

भाषणाच्या सुरुवातीलाच मोदींनी महाराष्ट्रातील जनतेला मराठीतून श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर लाखो बचत गटाशी जोडल्या गेलेल्या महाराष्ट्रातील बहिणींनाही कोट्यवधी रुपयांची मदत मिळाली आहे. आमचे जळगाव हे तर वारकरी परंपरेचे तीर्थ आहे. महान संत मुक्ताईची ही भूमी आहे. महिलांना म्हणाले, मला तुमच्यात राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुलेंची छाप दिसते. देशात १ कोटी लखपती दीदी झाल्या. त्यातील १ लाख तुमच्या महाराष्ट्रातील आहेत आणि शेवटी महायुतीचे सरकार गुंतवणूक आणि नोकरीची गॅरंटी असल्याचे सांगितले.

## महिलांवरील अत्याचार अक्षम्य पाप कुणीही दोषी...

हजार कोटींची रक्कम ऑनलाइन वर्ग करण्यात आली. यात अडीच हजार कोटी फिरता निधी आणि पाच हजार कोटींचे बँक कर्ज आहे. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, केंद्रीय मंत्री गिरिराजसिंह, केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, खासदार स्मिता वाघ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री गुलाबराव पाटील, मंत्री अनिल पाटील आदी उपस्थित होते. पंतप्रधानांनी बदलापूर तसेच कोलकाता येथील अत्याचाराच्या घटनांचा उल्लेख केला नाही. मात्र, देशातील माता, बहिणी आणि मुलींचे सामर्थ्य वाढवण्यासोबत त्यांची सुरक्षा ही प्राथमिकता असल्याचे ठणकावून सांगितले. सरकार येते आणि जाते. जीवनाची रक्षा आणि महिलांचा सन्मान हे समाज आणि सरकारचे सर्वात मोठे दायित्व असल्याचे ते म्हणाले.

**अभी तो ये ट्रेलर है... :** देशातील लाखो स्वयंसाहाय्यता समूहांना देण्यासाठी मोदींच्या हस्ते रिमोट दाबून ६ हजार कोटींची रक्कम ऑनलाइन वर्ग करण्यात आली. देशात १ कोटी लखपती दिदी बनल्या. यातही १ लाख नवीन लखपती दिदी महाराष्ट्रात तयार झाल्या. एका तराजूत यापूर्वीच्या सरकारचे सात दशक तर दुसऱ्या तराजूत मोदी सरकारचे दहा वर्षे ठेवा. मोदी सरकारएवढे काम कोणत्याच सरकारने केले नाही. २०१४ पर्यंत स्वयंसाहाय्यता समूहांना २५ हजार कोटी कर्ज देण्यात आले. गेल्या दहा वर्षांत ९ लाख कोटींचे कर्ज देण्यात आले. केंद्राच्या राबवलेल्या योजनांबाबत माहिती देत अभी तो ये ट्रेलर है असेही मोदी म्हणाले. आमचे जळगाव हे तर वारकरी परंपरेचे तीर्थ आहे. महान संत मुक्ताईची ही भूमी आहे. त्यांची साधना, तप आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. बहिणाबाईंच्या कविता विचार करायला भाग पाडतात असा गौरव केला. तर मुख्यमंत्री शिंदे यांनी जळगावचे सोने अस्सल बावनकशी आहे. येथे सोन्यापेक्षा सरस माणसे असल्याचे सांगितले.

**नार पार-गिरणा योजनेची निविदा काढण्यास मान्यता... :** जळगाव जिल्ह्याचे चित्र बदलणार आहे. नार-पार गिरणा योजनेमुळे शेतीला पाणी मिळणार आहे. या योजनेला मान्यता देण्यात आली आहे, कॅबिनेटमध्ये निविदा काढण्याची मान्यता देत आहोत. वाघूर प्रकल्पाला २२८८ कोटी, पाडळसरे प्रकल्पाला ४८९० कोटी अशा प्रकारे शेतकऱ्यांना सुजलाम सुफलाम करण्याचे काम करीत असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.